# अमरवेल

मधुसूदन कालेलकर



कमल शेडगे

# अमृतवेल

वि. स. खांडेकर यांच्या कादंबरीवर आधारित नाटक

मधुसूदन कालेलकर

मॅजेस्टिक

CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH
Date...

## तेथे कर माझे जुळती

काही काही साहित्यकृती मनाला विलक्षण हुरहुर लावून जातात. बेचैन करतात. ‘अमृतवेल’ ही तशीच एक साहित्यकृती आहे. १९६९ साली मी आजारी असतानाची गोष्ट. साधारणपणे आजारीपणातच मला भरपूर वाचनाची हौस भागवून घेता येते. त्यामुळेच की काय वर्षाभरातून एकदा तरी मी आजारी पडतोच. आणि डॉक्टरही कमीतकमी एकवीस दिवसांची सक्तीची विश्रांती ठोठावतात. या वेळीही अशीच एकवीस दिवसांची सक्तीची विश्रांती होती ! तिचा उपयोग मी मनसोक्त करून घेत होतो ! निर-निराळ्या साहित्यकृती वाचत होतो. नि त्यात भाऊसाहेब खांडेकरांची ‘अमृतवेल’ ही कादंबरी वाचनात आली. आणि अक्षरशः मी भारावून गेलो. त्यातून एक उत्तम नाट्यकृती निर्माण होऊ शकेल असं मनाला वाटू लागलं ! आणि त्या भरात नाटकाच्या दृष्टीने योग्य अशी टिपणं माझे मित्र बाबू सेंजित यांना डिक्टेट करू लागलो. टिपणं पूर्ण झाली पण प्रत्यक्ष नाटक लिहायचा काही मुहूर्त लागेना ! तो ७० साली लागला ! पहिल्या अंकाचा पहिला प्रवेश भालचंद्र कारखानीस व सुरेश फाळके यांच्याबरोबर खंडाळ्याला जाऊन लिहिला ! आणि एखाद्या सर्व स्टेशनात थांबणाऱ्या पॅसेंजरप्रमाणे हा प्रवास सुरू झाला ! जवळजवळ दीड वर्षानं नाटक लिहून पूर्ण झाले ! नाट्य-वैभव या संस्थेने मोठ्या आनंदाने हे नाटक बसवायला घेतलं ! त्या वेळी या नाटकाचं नाव होतं “खरंच माझं चुकलं का ?’- पण कधीकधी वेळ नि गणित यांचा मेळ बसत नाही तसंच या गणिता-चंहि झालं. तालमी सुरू होऊनही नाटक थंडावलं ! त्यानंतर मी लिहिलेली ‘या घर आपलंच आहे’– ‘ही वाट दूर जाते’ व ‘कल्पवृक्ष कन्येसाठी’ ही नाटकं रंगभूमीवर आली ! पण या नाटकाला काही मुहूर्त लागेना ! शेवटी तो लागला ! आणि आता ते नाटक रंगभूमीवर येत आहे ! प्रेक्षक त्याचं कसं काय स्वागत करतात ते अजून ठरायचं आहे.

या नाटकाच्या निमित्ताने मला भाऊसाहेब खांडेकरांसारख्या मोठ्या साहित्यिकाच्या मोठ्या मनाचा प्रत्यय आला तो मोठा मनोज्ञ होता. भाऊ-साहेबांची माझी फारशी ओळख नाही. एकदा ते माझ्या “दिल्या घरी तू सुखी रहा” या नाटकाला अध्यक्ष म्हणून आले होते. अमृतवेलवर मी नाटक तर लिहिलं खरं !. पण भाऊसाहेबांची परवानगी आवश्यक होती.

म्हणून माझे स्नेही श्री. पांडुरंग बेणारे (पूर्वी हे भाऊसाहेबांचे लेखनिक होते) यांना गळ घातली ! बेणाऱ्यांनी भाऊसाहेबांकडे माझ्या वतीनं शब्द टाकला नि भाऊसाहेबांनी होकार कळवला ! पण पुन्हा प्रश्न आला व्यवहाराचा ! पण भाऊसाहेब हे पडले तपस्वी ! त्यांनी सरळ सांगितलं की या कादंबरीसाठी म्हणून जे काही मानधन द्यावयाचे असेल ते बाबा आमटे यांच्या संस्थेला द्या ! एवढंच करून ते थांबले तर ते भाऊसाहेब कसले ! मध्यंतरीच्या काळात भाऊसाहेब आजारी पडले ! त्या काळात त्यांनी एक 'वील' केलं नि त्यात "अमृतवेल" या कादंबरीवर नाटक लिहायची परवानगी मी कालेलकरांना दिली आहे असं एक कलम टाकलं ! बेणाऱ्यांकडून ही गोष्ट मला कळताच एका वेगळ्याच आदरानं माझं मन ओसंडून आलं ! भाऊसाहेबांना मी अजूनपर्यंत या कादंबरीपोटी काहीही दिलेलं नसताना मृत्युपत्रात असं कलम घालणारे भाऊसाहेब मला केवढे तरी मोठे वाटू लागले आणि आपण किती लहान आहोत याची कल्पना आली.

या नाटकाला बऱ्याच सुहृदांचा हातभार लागला आहे. मी आजारी असताना मला पाहायला आलेल्या आमच्या संस्थेतील एक कलाकार कु. शीला बालावलकर हिने 'अमृतवेल' कादंबरी नाटकासाठी मी वाचावी अशी शिफारस केली नि माझा धाकटा भाऊ अनंत (सुरेश) याने आपल्या घरून या कादंबरीची प्रत लगेच मला आणून दिली. नोट्स बाबू सेंजितने लिहून काढल्या आणि रंगावृत्तीही ! नाट्य-वैभवचे सूत्रधार श्री. वसंतराव कानसे यांनी प्रथम हे नाटक घेतले- त्याच्या कॉपीज् काढल्या – त्याचा मुहूर्तही केला- सेन्सॉरही करून घेतले. पण नाटक शेवटी वेगळ्याच संस्थेकडे गेले ! श्री. वसंतराव कानसे यांचे श्रम फुकट गेले याबद्दल खरोखरच मला वाईट वाटते. हे नाटक वाचून दाखवल्यानंतर डॉ. श्रीराम लागू- प्रा. मधुकर तोरडमल- श्री. राजा ठाकूर यांनी ज्या ज्या सूचना केल्या त्याचा मला फार उपयोग झाला ! या नाटकाचे दिग्दर्शक पुरुषोत्तम बाळ यांनी तर कमालच केली ! या नाटकावर त्यांनी इतक्या नोटस् काढल्या की त्याचे एक स्वतंत्र नाटक झाले असते ! इतका मेहनती डायरेक्टर विरळा ! वेलकम थिएटर्सचे श्री. धुरत व रंगधाराचे सूत्रधार श्री. कापडी व बल्हाण यांनी मोठ्या जिद्दीने हे नाटक रंगभूमीवर आणायचं ठरवलं आणि ते आणलंही ! फार थोडे दिवस राहिले असताना कोल्हापूर येथील पहिल्या प्रयोगाच्या वेळी पुस्तक छापून प्रकाशित करण्याचं आव्हान स्वीकारून ते खरं करून दाखवणारे माझे मित्र प्रकाशक श्री. केशव कोठावळे नेपथ्यकार पांडुरंग कोठारे आणि नाटकातील कलावंत व पडद्यामागील तंत्रज्ञ या सर्वांचा हातभार या नाटकाला लागला आहे. आता पुढचं सारं माझ्या प्रेक्षकांच्या हाती ! त्यांच्याच हाताचा आधार मला वेळोवेळी मिळाला आहे ! यावेळीही तो मिळेल.

जाता जाता एका गोष्टीचा मला निर्देश करावासा वाटतो. तो म्हणजे गेल्या पिढीतल्या साहित्यिकांच्या मनाच्या मोठेपणाचा ! कै. आचार्य अत्रे- पद्मभूषण ना. सी. फडके आणि पद्मभूषण वि. स. खांडेकर ! त्या काळातले हे दत्तात्रयच ! या तिघांच्या रूपानं मला मराठी साहित्यातली खरी मोठी माणसं भेटली ! भव्य नि दिव्य ! "अपराध मीच केला" या नाटकाच्या वेळी आचार्य अत्र्यांनी केलेली मदत- त्यांनी केलेलं कौतुक ! 'अखेरच्या बंडावर' मी लिहिलेल्या 'हे फूल चंदनाचे' या नाटकाच्या वेळी कसलीही अट न घालता परवानगी देणारे अप्पासाहेब फडके- नि नाटक पाहून त्यांनी दिलेली शाबासकी ! आणि 'अमृतवेल'च्या वेळी मृत्युपत्रात ते कलम घालणारे भाऊसाहेब खांडेकर नि त्यांचा माझ्या लेखणीवरील विश्वास ! हे सारं आठवलं की आठवतात कविवर्य बा. भ. बोरकरांच्या काव्यपंक्ती–

दिव्यत्वाची जेथ प्रचिती
तेथे कर माझे जुळती

मधुसूदन कालेलकर
'ज्ञानदेवी' साहित्यसहवास
वांद्रा (पूर्व), मुंबई ५१.
१६-११-७२

पहिला प्रयोग

'अमृतवेल' ह्या नाटकाचा प्रथम प्रयोग रविवार दि. २६।११।७२ रोजी रात्रौ ९-३० वाजता पद्मभूषण वि. स. खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली केशवराव भोसले नाट्यगृह, कोल्हापूर येथे करण्यात आला.

दिग्दर्शक – पुरुषोत्तम बाळ

निर्मिती – वेलकम थिएटर – रंगधारा
नेपथ्य – पांडुरंग कोठारे
पार्श्वसंगीत – प्रभाकर पंडीत
ध्वनी – गजानन गानु
रंगभूषा – हरीश कवठेकर
वेशभूषा – बाबूलाल चिधाटे व रघुनाथ सावंत
निर्मिति–व्यवस्था – उदय धुरत व वसंत विचारे
निर्मिति – पांडुरंग धुरत सौ. शैला वेल्हे
दत्तात्रय कापडी जयसिंग चव्हाण

पात्र योजना

देवदत्त–अरुण सरनाईक
अलकनंदा–इंदुमती पैंगणकर (कानन कौशल)
वसुधा–आशा पोतदार
आई–उषा लिमये
मधुरा–बेबी निवेदिता जोशी
बापू मास्तर–नंदा फडके
जगूकाका–मोहन कोठीवान
दादा–विनय काळे
गंगाराम–वसंत विचारे
पार्वती–विमल गोरक्षे

## अंक पहिला

### दृश्य पहिले

[मुंबई शहरातील तीन खोल्यांचा एक सुसज्ज ब्लॉक ! या घरात राहतात इनमीन तीन माणसं ! दादा म्हणजे घरातील कर्ते पुरुष. त्यांची पत्नी माई नि एकुलती एक मुलगी अलकनंदा ! अलकनंदा वीस वर्षांची असून पदवीधर आहे. पडदा उघडतो तेव्हा अलकनंदाच्या बेडरूमचं दृश्य दिसतं. वेळ दिवे लागणीची. ब्लॉक तिसऱ्या मजल्यावर असल्यामुळे रस्त्यावरील लँप पोस्टचा वरचा भाग खिडकीतून दिसत आहे. खोलीत तसा अंधार आहे. उघड्या खिडकीतून रस्त्यावरील पावसाच्या सरी लँप पोस्टच्या प्रकाशात चमकत आहेत. त्या खोलीत एक छोटासा बेड– एक टेबल– एक खुर्ची एवढंच फर्निचर आहे. समोर भिंतीवर शेखरचा वैमानिकाच्या वेषातला फोटो आहे. त्याला हार घातलेला आहे. त्या फोटोसमोर नंदा पाठमोरी उभी आहे. तोच पूर्वी कधीतरी घडलेल्या प्रसंगातील संवाद ऐकू येऊ लागतात.]

**नंदा :** शेखर, तुला आठवतं, अशाच एका पावसाळी रात्री आपण दोघं बसलो होतो किनाऱ्यावर– पावसाच्या धुंद सरी अंगावर घेत–

**शेखर :** त्या वेळी साक्षीला चंद्र नव्हता– चिटपाखरूसुद्धा नव्हतं. होत्या फेसाळलेल्या लाटा आणि चोरून हितगुज ऐकणारा वारा ! त्या वेळी तू मला विचारलंस–

**नंदा :** इश्श ! मी काहीच विचारलं नाही– विचारलंस तू !

**शेखर :** मी ? असेलही ! पण माझा प्रश्न मला आठवत नसला तरी तुझं

उत्तर आठवतंय मला.

नंदा : खरंच !

शेखर : हं ! ते उत्तर तुझ्या ओठांतून आलं नव्हतं तरी ओठांनीच दिलं होतं.

नंदा : इश्श !

शेखर : नंदा—

नंदा : शेखर पाहिलास ! पाखरांचा केवढा मोठा थवा आकाशाच्या रोखानं झेप घेतोय.

शेखर : आमची विमानंही अशीच झेप घेतात– पाखरासारखी ! पण विमान ढगांच्या वर आलं की मनाचं पाखरू मुकं होतं. पण डोळ्यांच्या पाखरांना विलक्षण वेग येतो नि तुझ्या माझ्या प्रत्येक भेटीचा प्रसंग पांढऱ्या शुभ्र ढगावर रेखाटलेला दिसू लागतो.

नंदा : आज एका वैमानिकाचा कवी झालेला दिसतोय.

शेखर : खरं सांगू नंदा, तुझ्या सहवासात माझ्यासारख्या रुक्ष वैमानिकालाही काव्य सुचू लागतं. जरा समोर बघ नं ! लाल झालेल्या क्षितिजाकडे. वाटतं कुंकवाचा केवढा मोठा करंडा सूर्याचा पाय लागून लवंडला आहे. त्यातलं सारं कुंकू आभाळात सांडलं आहे.

नंदा : त्या सूर्याच्या नावानं लावलेलं ! तुला पृथ्वीचं प्रेमगीत ही कविता आठवते ?

शेखर : तुझ्याच ओठांतून त्याची पारायणं ऐकली आहेत. मी एकटा असलो विमानात की ही कविता आठवते. वर सूर्य हसतो आहे– खाली पृथ्वी विसावली आहे– थकून वाट पाहून युगानुयुगं.

नंदा : युगा मागुनी चालली ही युगे ।
करावी किती भास्करा वंचना ।।
किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी ।
कितीदा करू प्रीतिची याचना ।।

शेखर : नंदा, आता फार वाट पहावी लागणार नाही. लग्नाची तिथी ठरली आहे. पत्रिका छापायला गेल्या आहेत. त्याचा मसुदाही पाठ आहे. दाखवू म्हणून ! श्री मंगेश प्रसन्न. आमचे येथे श्रीकृपेकरून आमची कन्या चि. सौ. कां. नंदा हिचा विवाह कॅप्टन शेखर यांच्याबरोबर– (एकदम विमानाचा मोठा आवाज होतो नि नंदा किंचाळते "शेखर" म्हणून. त्याच वेळी दादा आत येतात. दिवा लावतात. तिच्याजवळ जातात. तिच्या पाठीवरून हात फिरवतात. नंदा 'दादा' म्हणून त्यांच्या कुशीत तोंड लपवून रडू लागते.)

दादा : नंदा, तुझं दुःख कळतंय मला. पण बेटा तुझ्या आईकडे बघून हे दुःख



विसरायला हवंय तुला–तिच्यासाठी.

नंदा : दादा, काय झालं हो हे असं !

दादा : एखाद्या स्वप्नासारखं घडलं सारं ! किती आनंदात होती तुझी आई शेखरसारखा वैमानिक जावई मिळाला म्हणून ! साखरपुडा झाला– लग्नाच्या पत्रिकासुद्धा छापायला गेल्या.

नंदा : पण देवाच्या छापखान्यात वेगळीच पत्रिका छापून तयार होत होती.

दादा : तुझ्या–आपल्या एकुलत्या एक मुलीच्या भाग्यात माईला आभाळ ठेंगणं वाटत होतं. पण ते आभाळ भरून आलं दुःखाच्या काळ्या ढगांनी नि वाहू लागलं आपणा सर्वांच्या डोळ्यांतून. त्या विमान अपघातात शेखर–

नंदा : नको दादा, त्या दुर्घटनेची आठवणसुद्धा नको ! तो घाव आठवला की वाटतं दादा की विचारावं तुमच्या देवाला.

दादा : परीक्षकाला उत्तर विचारून काय उपयोग नंदा ? मला ठाऊक आहे नंदा, त्या अपघातात खरी जायबंदी झालीस तू. तुझं बोलणं सरलं-हसणं रुसलं. गेले महिनाभर तर तू स्वतःला कोंडून घेतलंस या खोलीत.

नंदा : दादा—

दादा : पण आज महिनाभरानं तू घराबाहेर पडलीस म्हणून किती आनंदात होतो माई आणि मी. पण तू परत आलीस ती अबोल होऊन. आई-वडलांना सुख देता येतं पोरीला तसं दुःख कमी करता आलं असतं तर किती बरं झालं असतं.

नंदा : पण काही मुलींच्या ललाटी कुंकवाच्या जागी दुःखाच्या आडव्या रेषा कोरलेल्या असतात. आणि डोळ्यांतल्या काजळरेषेच्या जागी अश्रूंचे सर ओघळत असतात. (मान फिरवून अश्रू पुसते.)

दादा : तुला निदान अश्रू ढाळायला तरी मोकळीक आहे. तुझ्या आईला तीही नाही. आईला रडता येत नाही. आईच रडू लागली तर इतरांचे अश्रू कोण पुसणार ?

नंदा : दादा, मला सारं कळतंय. पण मनाला कसं समजावू ? जागेपणी पाहिलेलं स्वप्न झोपेतसुद्धा विसरता येत नाही हो मला.

दादा : पण बेटा, भग्न स्वप्नाच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही. एखादं स्वप्न पहाणं, ते फुलवणं, ते सत्यसृष्टीत उतरावं म्हणून धडपडणं आणि दुर्दैवानं ते स्वप्न भंगलं तरी त्याच्या तुकड्यांवरनं रक्ताळलेल्या पावलांनी दुसऱ्या स्वप्नामागं धावणं हा मानवी धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो यामुळं.

नंदा : दादा, सुभाषितांच्या मलमपट्टीनी मनातल्या जखमा बऱ्या होत नाहीत. मला क्षमा करा दादा, पण मी विसरू शकत नाही शेखरला.

**दादा :** बेटा, तुला काय वाटतं प्रेमभंगाची जखम फक्त तुझ्याच वाट्याला आलीय. मी सुद्धा ती जखम सोसलीय.

**नंदा :** दादा...

**दादा :** मी कॉलेजात होतो त्या वेळी शेजारची एक मुलगी मला फार आवडायची. तिच्याशी आपलं लग्न व्हावं असं वाटायचं. पण ते झालं नाही. ते दुःख माझ्या मनात अनेक दिवस सलत राहिलं. पुढे माई माझ्या आयुष्यात आली. उन्हाळ्यात गार वाऱ्याची झुळूक यावी तशी. प्रथम कर्तव्य म्हणून आणि नंतर आनंद होऊ लागला म्हणून माईला सावली देण्यात मी रमून गेलो. जी जखम असाध्य वाटत होती तिचा साधा व्रणसुद्धा राहिला नाही पुढे.

**नंदा :** मला क्षमा करा दादा. मघाशी जाताना मी खोटं बोलले माईकडे! मी मैत्रिणीकडे जाते म्हणून. पण मी गेले होते—

**दादा :** कुठे गली होतीस तू ?

**नंदा :** मी आणि शेखरनं ज्या ज्या जागी गुजगोष्टी केल्या होत्या, तिथ तिथं मी वेड्यासारखी भटकत होते. एखाद्या समाधीचं दर्शन घ्यावं तशी आम्हां दोघांच्या भेटीगाठीची प्रत्येक जागा पाहिली. आणि वाटलं काही अर्थ उरला नाही या जीवनात. त्याचा शेवट करून टाकावा. आणि जवळपास कुणी नाही हे पाहून मी पाण्यात पाऊल टाकलं.

**दादा :** नंदा बेटी !

**नंदा :** होय दादा—गौरीहार पुजून बोहल्याकडे जाणाऱ्या नववधूसारखी मी मृत्यूला माळ घालण्यासाठी पुढे पुढे जाऊ लागले आणि—

**दादा :** आणि काय बेटी—?

**नंदा :** त्याच क्षणी मला तुमची आठवण झाली. तुम्ही केलेलं प्रेम, ममता, माईची अबोल करुण मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहिली. अक्का गेल्यापासून ती दुःखीच आहे. मनात आलं तिचं दुःख आपण हलकं करायचं की आपण त्यात भर घालायची ? आणि मृत्यूचं किलकिल केलेलं दार मी हळूच लावून घेतलं नि परत फिरले.

**दादा :** नंदा, पुन्हा असला वेडा विचार मनात आणायचा नाही, स्वप्नभंग हा माणसाचा कायमचा सोबती आहे. तुला आठवतं – चार वर्षांपूर्वी सुमित्रा तुझी आक्का, अचानक गेली लहानग्या मिलिंदला पोरका करून! शक्तीबाहेर खर्च करून तिच्या आवडीचं स्थळ मी तिला करून दिलं तुझ्या माईसाठी. पण दुर्दैवानं आक्काला अचानक आपल्यातून ओढून नेलं. ती रात्र—

**नंदा :** ती रात्र आपण कुणीच कधी विसरू शकणार नाही. माईला त्या रात्री झोपेचं औषध देऊन निजवलं होतं. छोटा मिलिंद रडून रडून तिच्या कुशीत झोपी गेलेला होता.

**दादा :** रात्री दोन वाजता तुझाही डोळा लागला. पण मी जागा होतो. माई मध्येच जागी होईल म्हणून तिच्या उशाशी बसून होतो. खिडकीकडे सहज पाहिलं. हळूहळू पहाट झाली होती. आपल्या घरावरून जाणारा एक साधू भजन गात होता. 'मोगरा फुलला, मोगरा फुलला' हा ज्ञानदेवांचा अभंग ऐकला नि ज्या घरात कधीही कुणाचा मृत्यू झालेला नाही त्या घरातून मूठभर मोहऱ्या आणायला सांगणारी बुद्धदेवांची मूर्ती समोर उभी राहिली. नि वाटलं आपण फक्त आपल्याच दुःखाचा विचार करतो. म्हणूनच आपलं दुःख आपल्याला फार फार मोठं वाटत असतं.

**नंदा :** दादा...

**दादा :** तू काहीही कर नंदा, पण दुःखाच्या पिंजऱ्यात स्वतःला अशी बंदीवान करून घेऊ नकोस. त्या पिंजऱ्याचं दार उघड. पंख पसर नि आकाशात भरारी मार—आणि जीवनाचा अर्थ विचारायचाच असेल तर त्या आकाशाला विचार.

**नंदा :** दादा तुम्ही काळजी करू नका. तुम्हाला नि माईला दुःख होईल असं काहीही घडणार नाही माझ्या हातून! कालची नंदा संपली. स्वतःचं दुःख उगाळत बसणारी. जीवनाला घाबरलेली भ्याड नंदा बदलली. सांगा, मी काय केलं म्हणजे तुम्हाला बरं वाटेल ?

**दादा :** सांगू ? या जागेपासून काही दिवस दूर जा.

**नंदा :** कंटाळा आला माझा दादा...

**दादा :** नाही बेटा, तुझ्यासाठीच सांगतोय मी. इथून दूर गेल्याशिवाय जखमेवर खपली धरायची नाही.

**नंदा :** दूर म्हणजे कुठं जाऊ ? हिमालयात ?

**दादा :** हिमालयात संसारी माणसं जात नाहीत. तुला अजून संसार करायचा आहे. तुझ्या माईसाठी...

**नंदा :** दादा,

**दादा :** तुला इथून दूर जायचा योगही चांगला आलाय.

**नंदा :** म्हणजे ?

**दादा :** अग तुझी ती मैत्रीण वसुधा.

**नंदा :** म्हणजे वसुधा गुप्ते.

**दादा :** हो. ती मघा भेटली दासबाबूंकडे. तिला कंपॅनिअन हवी आहे. बिलासपूरला मोठी जहागिरी आहे तिची.

**नंदा :** वसू तुम्हाला भेटली. (दारात वसुधा येते.)